शासकीय परिवहन सेवा, वरळी कार्यालयातील गट-ड संवर्गातील पदे निरसित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.शापसे-३४१९/प्र.क्र.३२/का.३१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- २८ फेब्रुवारी, २०१९

वाचा:- वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.५७/२०१५/विसु-१, दि. १४.०१.२०१६.

प्रस्तावना:-

सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयातील पदांच्या आकृतिबंधाच्या दि. २७.०८.२००९ च्या शासन निर्णयानुसार गट-ड संवर्गात एकूण ३९ पदे मंजूर आहेत. त्यात कुशल सहाय्यक, अकुशल कामगार, स्वच्छक/धुणारा/ हमाल, सहाय्यक, टायरमन, खरवडणारा, शिपाई, पहारेकरी, सफाईगार इ. विविध पदांचा समावेश आहे. वित्त विभागाच्या उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयातील परि. १ (५) नुसार गट-ड संवर्गातील २५% पदे निरसित करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्यानुसार शासकीय परिवहन सेवा कार्यालयातील गट-ड संवर्गातील पदे निरसित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

वित्त विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयास सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयातील या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविलेली गट-ड संवर्गातील रिक्त असलेली २५% प्रमाणे एकूण १० पदे या शासन निर्णयान्वये निरसित करण्यात येत आहेत.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र.२०१९०२२८१०५८४०९७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arvind Bhimrao More

Digitally signed by Arvind Bhimrao More
DN: CN = Arvind Bhimrao More, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = General Administration Department
Date: 2019.02.28 11:01:52 +05'30'

(अ.भि.मोरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मुख्य सचिव, महराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२. सहसचिव तथा संचालक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई.
३. उप सचिव (आस्थापना), मंत्रालयीन सर्व विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
९. वित्त विभाग, व्यय-४ / आ.पु.क., मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०. निवडनस्ती

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.शापसे-३४१९/प्र.क्र.३२/का.३१,

दिनांक- २८ फेब्रुवारी, २०१९ सोबतचे परिशिष्ट

अ.क्र.	**कार्यालय**	**मंजूर पदे**	**पदनाम**	**निरसित करावयाची पदे**
१.	शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई-४०००३०	२	खरवडणारा	१
२.		१	सहायक टायरमन	१
३.		१३	कुशल सहायक	२
४.		४	अकुशल कामगार	२
५.		७	स्वच्छक / धुणारा / हमाल	३
६.		५	शिपाई	१
७.		३	पहारेकरी	०
९.		४	सफाईगार	०
एकूण		**३९**		**१०**

Arvind Bhimrao More

Digitally signed by Arvind Bhimrao More
DN: CN = Arvind Bhimrao More, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = General Administration Department
Date: 2019.02.28 11:02:12 +05'30'

(अ.भि.मोरे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन